जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2024
पुढारी

# 'पर्सिस्टंट'च्या डॉ. आनंद देशपांडे यांचे आज शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभाग, संगणकशास्त्र विभाग व एमबीए युनिट, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'अपॉर्च्युनिटी फॉर दी इंडस्ट्रिज इन दी एज ऑफ डिसरप्टिव्ह टेक्नॉलॉजी' या विषयावर पर्सिस्टंट सिस्टीम्सचे संस्थापक, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. आनंद देशपांडे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि. ११) सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असतील. याप्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांची उपस्थिती असणार आहे. एमबीए युनिटच्या संचालक डॉ. दीपा इंगवले, संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता एस. ओझा, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. पी. डी. पाटील कार्यक्रमाचे संयोजन करीत आहेत. व्याख्यानाचा लाभ विद्यार्थी व संशोधकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2024
लोकमत

# डॉ. आनंद देशपांडे यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभाग, संगणकशास्त्र विभाग व एमबीए युनिट, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग यांच्या वतीने पर्सिस्टंट सिस्टिम्सचे संस्थापक, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. आनंद देशपांडे यांच्या विशेष व्याख्यानाचे आज बुधवारी (दि. ११) सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजन केले आहे. 'अपॉर्च्युनिटी फॉर दी इंडस्ट्रीज इन दी एज ऑफ डिसरप्टिव्ह टेक्नॉलॉजी' या विषयावर डॉ. देशपांडे मांडणी करतील. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद पाटील, प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2024
सकाळ

# डॉ. आनंद देशपांडे यांचे आज विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभाग, संगणकशास्त्र विभाग, एमबीए युनिट, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग यांच्यातर्फे 'अपॉर्च्युनिटी फॉर दी इंडस्ट्रीज इन दी एज ऑफ डिसरप्टीव्ह टेक्नॉलॉजी' या विषयावर पर्सिस्टंट सिस्टिम्सचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. आनंद देशपांडे यांचे बुधवारी सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान होईल. या व्याख्यानच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील विशेष उपस्थित असणार आहेत.

11 DEC 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सुधीर रसाळ यांचे प्रतिपादन : डॉ. आर.व्ही. देशपांडे यांचा ग्रंथ मराठीसाठी मार्गदर्शक : डॉ. शिर्के

# मराठी नवसमीक्षा ग्रंथामुळे मोठ्या कालखंडाचा अभ्यास करता येईल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मराठी समीक्षेचा मोठ्या कालखंडाचा अभ्यास करणारी साधनसामग्री प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे यांच्या ग्रंथामुळे उपलब्ध झाली, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. सुधीर रसाळ यांनी मंगळवारी केले. डॉ. देशपांडे यांचा हा ग्रंथ मराठीच्या वाचकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.



कोल्हापुरात महावीर महाविद्यालयाच्या ॲम्फी सभागृहात मंगळवारी नवसमीक्षा ग्रंथाचे प्रकाशन डॉ. सुधीर रसाळ यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. रघुनाथ कडाकणे, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. रणधीर शिंदे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. व्ही. देशपांडे, डॉ. आर. पी. लोखंडे उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

महावीर महाविद्यालयात संस्कृती प्रकाशन, पुणे आणि देशपांडे कुटुंबीयांतर्फे प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडेलिखित मराठी नवसमीक्षा : उद्गम आणि विकास या ग्रंथाचे प्रकाशन प्रा. डॉ. रसाळ यांच्या हस्ते करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के अध्यक्षस्थानी होते. डॉ. रसाळ म्हणाले, मराठी कविता, मराठी वाङ्मय नीट समजावून घ्यायचे असेल तर नवसमीक्षेचे सिद्धांत उपयोगी पडतात. मराठीत खऱ्या अर्थाने समीक्षा नीट समजावून देणारा ग्रंथ आवश्यक होता, त्याची पूर्तता या ग्रंथाने केली. लेखकाच्या कलाकृतीवर कोणत्याही वादाचा प्रभाव असता कामा नये, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले. डॉ. शिर्के म्हणाले, लेखक देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठाने भाषा विभाग आणि तंत्रज्ञान विभागाने विश्वसाहित्यासाठी एकत्रित काम करण्याचे सुचविले, त्यासाठी विद्यापीठ पुढाकार घेईल, असे सांगून अभिजात मराठीसाठी विद्यापीठातील तरुणांची फळी नेतृत्व करेल, असे जाहीर केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रा. डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, डॉ. देशपांडे यांनी मराठी समीक्षा वाहती ठेवण्यासाठी मौलिक लेखन केले. राजाराम महाविद्यालयाचे इंग्रजी विभागप्रमुख डॉ. रघुनाथ कडाकणे म्हणाले, समीक्षेसाठी सूक्ष्मवाचनासोबत आता नवतंत्रज्ञानाचा वापर करण्याची वेळ आली आहे. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी परिचय करून दिला, तर प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य आर. जे. कुलकर्णी, संभाजी भांबर, माजी प्राचार्य प्रवीण चौगुले, नागेश नलावडे, आलोक जत्राटकर, प्रा. निरंजन जरंडीकर, प्रा. हिमांशू स्मार्त उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2023
सकाळ

# डीकेटीईचे 'अंबर' नियतकालिक शिवाजी विद्यापीठात प्रथम

इचलकरंजी, ता. १० : विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यातील सृजनशीलता वृद्धिंगत व्हावी, यासाठी डीकेटीईच्या टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये प्रतिवर्षी 'अंबर' हे नियतकालिक प्रकाशित केले जाते. प्रतिवर्षी शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिका स्पर्धेचे आयोजन करते.

२०२२-२३ च्या शिवाजी विद्यापीठातील या स्पर्धेत व्यावसायिक महाविद्यालये या गटातून डीकेटीईच्या 'अंबर' या नियतकालिकेस २०२३ चा प्रथम क्रमकांचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन 'अंबर'चे संपादक आर. डी. शिर्के यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रभा कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रजिस्ट्रार डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. एम. व्ही. गुळवणी उपस्थित होते. 'अंबर'मध्ये विद्यार्थ्यांच्या दर्जेदार साहित्याबरोबरच माहितीपूर्ण लेखांचा तसेच रंगचित्रे, चित्ररेखाटन यांचा समावेश होता.